| | |
|---|---|
| MHYA160011042025 | पी.डब्ल्यु. डी. व्ही. क्र. २३/२०२५<br>ममता वि. सौरभ |

## निशाणी ०५ वरील आदेश

०१. अर्जदाराने हा अर्ज अंतरीम खावटी मिळण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ याच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महीलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराच्या अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दिनांक ०२.०५.२०२४ रोजी मौजे पुलगाव येथे समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाला. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदावयास गेली. अर्जदार ही गैरअर्जदाराकडे कौटूंबिक नातेसंबंधातून एका छताखाली राहत असतांना तिच्यावर गैरअर्जदार यांनी शारीरीक व मानसीक हिंसाचार केल्यामुळे अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदाराने मूळ अर्ज हा कौटूंबिक हिंसाचारापासून महीलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ अंतर्गत दिलेला असून सदरच्या अर्जावर पुराव्याअंती न्यायनिर्णय करण्यास वेळ लागणार आहे. अर्जदार ही कोणताही कामधंदा करीत नसून तिच्या आईवडीलांच्या आश्रयाने जिवन जगत आहे. अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधण नसल्याने तिच्या स्वतःच्या पालनपोषनाकरीता, औषधपाण्याकरीता खावटीची आवश्यकता आहे. गैरअर्जदार क्र. १ हा विलास नगर चौसाळा, यवतमाळ येथे खाजगी नौकरी करीत असून त्याला दरमहा २०,०००/– रुपये मिळतात. गैरअर्जदार यांचे विलास नगर यवतमाळ येथे चार खोल्यांचे घर आहे. गैरअर्जदार क्र. १ याच्या उत्पन्नावर अर्जदाराशिवाय अन्य कोणीही अवलंबुन नाही. त्यामुळे अर्जदाराला गैरअर्जदार क्र. १ याने दरमहा १०,०००/– रुपये अंतरीम पोटगी दयावी अशी विनंती केली आहे.

०३. गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांना अर्जाच्या नोटीसची बजावणी योग्यरित्या

झाल्यानंतर त्यांनी हजर होवून निशाणी क्र. ११ वर म्हणणे दाखल करुन अर्जदाराच्या अर्जातील संपूर्ण कथने नाकारली आहेत. गैरअर्जदार क्र. १ याने अंतरीम पोटगीच्या अर्जाला निशाणी क्र. १३ वर म्हणणे दाखल केले आहे.

०४. अर्जदार हिच्या अर्जातील कथने, अर्जदाराचे विधिज्ञ श्री. एस. डी. ठाकरे व गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. बदनोरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर माझ्या पुढे खालील मुद्दे उपस्थित झाले असून मी त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदाराने प्रथमदर्शनी हे सिध्द केले आहे का की, तिच्यावर गैरअर्जदार यांनी कौटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार केला आहे. | ... होकारार्थी |
| २. | अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ यांच्याकडून अंतरीम पोटगी म्हणून दरमहा १०,०००/–रुपये मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...अंशतः होकारार्थी. |
| ३. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबत–**

०५. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार लग्नानंतर ज्यावेळी अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे नांदावयास गेली त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी तिचा शारीरीक व मानसीक छळ करुन गैरअर्जदारांनी तिला टोमणे मारणे, अपमानीत करुन बोलणे, तुझ्या घरच्यांनी काही केले नाही, तुला स्वयंपाक करता येत नाही, तुझा या घरामध्ये अधिकार नाही, आम्हाला हुंडा दिला नाही, माहेरुन पाच लाख रुपये घेवून

ये असा त्रास दिला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांनी अर्जदारासोबत भांडण करुन घरातून तिला बाहेर काढून दिले. ऑगस्ट २०२५ पासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या कथनांचा विचार करता अर्जदार ही लग्ननानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्याबरोबर एका छताखाली राहत असतांना गैअर्जदाराने तिचा शारीरीक व मानसीक छळ केलेला आहे या निष्कर्षास मी आलेलो आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ बाबत–**

०६. अर्जदार हिने कौटूंबिक नातेसंबधातून गैरअर्जदारांकडे राहत असतांना तिच्यावर कौटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे कौटूंबिक हिंसाचारापासून महीलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये प्रथम दंडाधिकारी यांना अंतरिम पोटगीबाबत आदेश मंजूर करण्याचा अधिकार आहे. अर्जदार हिला अंतरिम पोटगी मंजूर करण्याच्या अगोदर गैरअर्जदार क्र. १ याची आर्थीक परिस्थीती, गैरअर्जदार क्र. १ वर अवलंबून असलेल्या व्यक्ती, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांची कौटूंबिक परिस्थीती याबाबींचा विचार करणे आवश्यक आहे. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार क्र. १ हा चंदुलाल छगनलाल पोबारु यांच्या कंपनीमध्ये खाजगी नोकरी करतो. गैरअर्जदार क्र. १ याला दरमहा २०,०००/– रुपये पगार आहे. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार यांचे विलास नगर यवतमाळ येथे चार खोल्यांचे घर आहे. गैरअर्जदार क्र. १ याने सदरची बाब नाकारुन तो सध्या बि. ए. चे शिक्षण घेत असून मिळेल त्यावेळी मजुरीचे काम करतो असा बचाव घेतलेला आहे. अर्जदार व गैरअर्जदारांनी त्यांच्या म्हणण्यांच्या पृष्ठर्थ कागदोपत्री पुरवा अभिलेखावर दिलेला नाही. परंतू अशा परिस्थीतीतही गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे उत्पन्नाचे साधण असावे असे माझे मत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने धर्मपत्नी या नात्याने अर्जदाराचा सांभाळ, पालणपोषण करणे आवश्यक आहे. गैरअर्जदार क्र. १ हा मजूरीचे काम करुन त्यामधून उत्पन्न कमवित असला तरी त्याच्यावर असणारी अर्जदाराची जबाबदारी तो टाळू शकत नाही. अर्जदाराकडे

उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिच्या अन्नधान्य, औषधोपचार व ईतर जिवनावश्यक गरजांसाठी पोटगी देणे आवश्यक आहे. गैरअर्जदार क्र. १ याच्या उत्पन्नाचा विचार करता अर्जदाराला दरमहा २,०००/– रुपये पोटगी म्हणून देण्यास सक्षम आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशंतः होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्रमांक ३ बाबत-

७. मुद्दा क्रमांक १ व २ च्या निष्कर्षानंतर मी मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

०२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला दरमहा २,०००/– रुपये अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून दयावी असा आदेश देण्यात येतो.

०३. आदेशाची एक प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.06.17 17:51:59 +0530

बाभुळगांव. (एच. एस. सातपुते)
दिनांकः १७/०६/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाभुळगांव